**लातूर शहर महानगरपालिका लातूर**
**मुख्य कार्यालयः- मेन रोड,लातूर**
**(सामान्य प्रशासन विभाग)**

फोनः02382,242803,246075
2011 फॅक्सः02382,246074

स्थापना-25 ऑक्टोंबर
ई मेल - mclatur@yahoo.co.in

जा.क्रं./लाशमनपाला/सा.प्र.वि./ /२०२४ दिनांक- /०८/२०२४

# <u>उमेदवारांकरीता सुचना</u>

## <u>अग्निशमन विभागातील फायरमन (अग्निशामक) व चालक-यंत्रचालक पदासाठी पदभरती २०२३</u>

लातूर शहर महानगरपालिका सरळसेवा पदभरती २०२३ अंतर्गत दि.२२/०२/२०२३ ते दि.२३/०२/२०२३ या कालावधीत टि.सी.एस. मार्फत घेण्यात आलेल्या **फायरमन (अग्निशामक) व चालक-यंत्रचालक** या पदाच्या ऑनलाईन परीक्षेत उत्तीर्ण झाल्यामुळे आपण मैदानी चाचणी करीता पात्र झाला असुन आपण १०० गुणांच्या मैदानी चाचणी करीता खाली नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी उपस्थित रहावे.

**दिनांक ः- दि.६/०९/२०२४**

**वेळ ः- सकाळी ५.०० वाजता**

**ठिकाण ः- पोलीस मुख्यालय, बाभळगाव रोड, लातूर**

आवश्यक शारिरीक पात्रता मानक पुर्ण करणा-या उमेदवारास ऑनलाईन परिक्षा व मैदानी चाचणी मध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या व गुणवत्ताक्रमाधारे प्रवर्गनिहाय, समांतर आरक्षण व समान गुण असलेल्या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी विचारात घेऊन अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. **शारिरीक पात्रते मध्ये अपात्र आढळल्यास आपणास अपात्र करण्यात येईल.**

उपरोक्तप्रमाणे नमुद दिवशी व वेळी आपण उपस्थित न राहिल्यास आपणास नियुक्तीची आवश्यकता नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**(मा.आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने)**

उपायुक्त,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर

सोबत ः- १. लातूर शहर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम २०१९ परिशिष्ट (४) ची प्रत.

<u>अटी व शर्ती</u>

१. शारिरीक पात्रता व मैदानी चाचणीसाठी आपण स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी ऑनलाईन अर्ज भरतेवेळी दिलेला ओळखीचा पुरावा व स्वतःचे आधारकार्ड व त्याची स्वसाक्षांकित (Self attested) छायांकीत प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

२. शारिरीक पात्रता व मैदानी चाचणीसाठी आपण ऑनलाईन अर्जात उपलोड केलेले कागदपत्र (दस्ताऐवज) जसे शैक्षणिक अर्हता, अनुभव, जातप्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अदिवास प्रमाणपत्र व इतर सर्व कागदपत्र (दस्ताऐवज) यांची प्रत्येकी एक स्वसाक्षांकित प्रतीसह उपस्थित रहाणे अनिवार्य आहे.

३. शारिरीक पात्रता व मैदानी चाचणीसाठी येताना उत्तेजक द्रव्य व नशा येणा-या पदार्थाचे सेवन करू नये तसे आढळून आल्यास आपणास शारिरीक पात्रता व मैदानी चाचणीत अपात्र ठरविण्यात येईल.

४. उमेदवाराला शारिरीक पात्रता व मैदानी चाचणीसाठी प्रवासखर्च व इतर खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

५. उमेदवाराने नियुक्तीसंदर्भात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या राजकीय व इतर दबाव आणण्याचा केलेला प्रयत्न हा त्या उमेदवाराला त्या पदावरील नियुक्तीसाठी अनर्ह करणारा ठरेल.